# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Tarun Bharat 14-04-2016**

# जीआयटी कॉलेज अजिंक्य



**जीआयटी कॉलेज संघाचा कर्णधार सुमंत बेलींग मान्यवरांच्या हस्ते चषक स्वीकारताना. शेजारी पी. व्ही. कडदकाई.**

**बेळगाव :** म्हैसूरमधील एनआयईटी कॉलेज मैदानावर विश्वेश्वरय्या तांत्रिक विद्यापीठाच्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे अजिंक्यपद बेळगावच्या जीआयटी कॉलेज संघाने पटकाविले.

या स्पर्धेत उपांत्य सामन्यात बीएमएससीई (बेंगळूर) संघाचा ८ गडी राखून तर अंतिम सामन्यात एमएसआरआयटी (बेंगळूर) कॉलेज संघाचा ९ गडी राखून पराभव करत हॅट्ट्रीक केली.

विजेत्या संघात सुमंत वेलींग, केतांज कोल्हापुरे, नागेंद्र पाटील, मुक्तीनाथ चिनवाल, प्रशांत होनगेकर, कैफ जमादार, तेजस पवार, नोएल डिमेलो, अरिहंत, अमनाजी, शुभम हेरेकर, अभिषेक देसाई, विनीत नाईक, वरूण मण्णूरकर, सुयश खोत, गौतम कामत, शिरीष राणोजी यांचा समावेश होता.

जीआयटी कॉलेजचे गव्हर्निंग कौन्सिलिंग अध्यक्ष उदय कालकुंद्रीकर, जिमखाना अध्यक्ष आर. श्रीधर व प्राचार्य डॉ.ए.एस. देशपांडे यांनी जेत्या संघाचे अभिनंदन केले आहे.

या संघाला क्रीडा प्राध्यापक पी. व्ही. कडदकाई व क्रांती कुरणकर यांचे मार्गदर्शन मिळत आहे.